# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्रमांक १३४/२०२३

सदर परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील विविध विभागातील सर्व संबंधित शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व शिक्षकेतर सेवकांना कळविण्यात येते की, जे सेवक दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीमध्ये सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त झाले आहेत आणि सहाव्या वेतन आयोगानुसार मूळ सेवानिवृत्ती वेतनावर अंशराशीकरणाचा लाभ घेतलेला आहे, अशा सेवकांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणाऱ्या मूळ निवृत्तीवेतनावर सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ शासन निर्णय क्रमांक सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४ दि. ०५/०२/२०२१ नुसार देय करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ : शासन परिपत्रक क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४ दि. १९ जून २०२३ नुसार दि.०१.०१.२०१६ ते दि. ३१.१२.२०१८ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित अंशराशीकरणाचे लाभ देण्याची कार्यवाही अनेक प्रकरणांमध्ये प्रलंबित असून त्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यास लागणारा कालावधी विचारात घेता सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत न झालेल्या अंशराशीकरणाचे प्रस्ताव सादर करण्यास दि. ३१.१२.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

विद्यापीठातील विविध विभागातील उपरोक्त कालावधीमध्ये सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त झालेल्या शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व शिक्षकेतर सेवकांना कळविण्यात येते की, ज्या सेवकांना सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ घ्यावयाचा असेल अशा सेवकांनी या परिपत्रकासोबत जोडलेला विकल्प आणि आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करावी. सदरचा विकल्प आणि कागदपत्रे संबंधित प्रशासन शिक्षक कक्ष/प्रशासन शिक्षकेत्तर कक्ष विभागात शनिवार, दि.३०/१२/२०२३ पर्यंत सादर करण्यात यावीत. या मुदतीमध्ये जे सेवक विकल्प सादर करणार नाहीत त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार मूळ निवृत्तीवेतनावर सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ घ्यायचा नाही असे समजण्यात येईल. तसेच कुटुंब निवृत्तीवेतन धारकानां अंशराशीकरणाचा लाभ देय होत नाही याची नोंद घ्यावी.

तसेच ज्या शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे पदनाम मा.सर्वोच्च न्यायालयाच्या प्रभावाखाली आहेत,अशा कर्मचा-यांना सद्यस्थितीत सदरचा अंशराशीकरणाचा लाभ देय होणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीमध्ये सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त झालेल्या सर्व संबंधित शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व शिक्षकेतर सेवकांनी उपरोक्त बाबींची योग्य ती नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.
जा.क्र. : एएन/ 2124
दिनांक : 06 JUL 2023

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**सोबत : १. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ : शासन परिपत्रक क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४ दि. १९ जून २०२३**
**२. विकल्प अर्जाचा नमुना**

**प्रत माहितीसाठी व योग्यत्या कार्यवाहीसाठी :**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा. संचालक, सर्व प्रशाला
३. मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

} सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, हि विनंती.

सेवकाचे नाव :
सेवक क्रमांक :
पदनाम :

दिनांक :

प्रति,
मा.कुलसचिव,
प्रशासन शिक्षकेत्तर कक्ष,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे – ४११ ००७.

विषय : सातव्या वेतन आयोगानुसार दि. १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीतील सेवानिवृत्त निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतनाच्या ४० % भागाच्या सुधारीत अशंराशीकरण लाभ मिळण्याबाबत ...

संदर्भ :- शासन परिपत्रक क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४ दि. १९ जून २०२३

महोदय,

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन अंशराशीकरण) नियम , १९८४ मधील तरतुदीनुसार खाली दर्शविण्यात आल्याप्रमाणे मला माझ्या निवृत्तीवेतनाच्या ४० % भागाचे सुधारीत अंशराशीकरण करावयाचे आहे. आवश्यक तपशिल खाली दिला आहे.

| अ.क्र. | तपशिल | |
|---|---|---|
| १ | कर्मचा-याचे संपूर्ण नाव | |
| २ | कार्यालयाचे नाव | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे- ४११ ००७ |
| ३ | सेवानिवृत्तीच्या वेळी असलेले पदनाम | |
| ४ | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ५ | प्राधिकृत करण्यात आलेली मूळ निवृत्तीवेतनाची रक्कम | |
| ६ | निवृत्तीवेतन प्रदान आदेश (P.P.O No.) क्रमांक व दिनांक | |
| ७ | निवृत्तीवेतन प्रदान करणा-या कोषागाराचे नाव व संपूर्ण पत्ता | पुणे कोषागार, पुणे – ४११ ००१ |
| ८ | निवृत्तीवेतनधारक ज्या बँकेतून निवृत्तीवेतन घेत आहे त्या बँकेचे नाव/शाखेचे नाव | |
| ९ | निवृत्तीवेतन धारकाचा बँक खाते क्रमांक | |
| १० | निवृत्तीवेतनधारक यांचा मोबाईल क्रमांक | |
| ११ | निवृत्तीवेतनधारक यांचा ई-मेल पत्ता | |

स्थळ :
दिनांक :

निवृत्तीवेतनधारकाची सही

निवासी पत्ता :

कार्यालय प्रमुखांची स्वाक्षरी :
कार्यालयाचा शिक्का :

मोबाईल क्रमांक:

| | | |
|---|---|---|
| सोबत : | १. विकल्प फॉर्म (सुधारित अंशराशीकरणाचा विकल्प) | ३ छायांकित प्रती |
| | २. ६ व्या व ७ व्या वेतन आयोगानुसार सेवानिवृत्ती वेतन प्रदान आदेशाची छायांकित प्रत (PPO) | ३ छायांकित प्रती |
| | ३. सेवानिवृत्ती वेतन खाते पुस्तकाचे पहिले व शेवटच्या पानाची प्रत (पेन्शन पासबुक) | ३ छायांकित प्रती |
| | ४. आधार कार्ड | ३ छायांकित प्रती |
| | ५. पॅन कार्ड | ३ छायांकित प्रती |

सातव्या वेतन आयोगानुसार दि. १ जानेवारी २०१६ ते दि. ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांना सुधारित अंशराशीकरणाचा लाभ देण्यास मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १९ जून, २०२३.

संदर्भ : १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४, दि.०५.०२.२०२१

२) शासन पूरकपत्र, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४, दि.१२.०७.२०२१

३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४, दि.२२.०३.२०२२

४) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४, दि.०७.११.२०२२

## शासन परिपत्रक

दिनांक ०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीमध्ये जे शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत, आणि यापूर्वी सहाव्या वेतन आयोगानुसार मूळ निवृत्तिवेतनावर अंशराशीकरणाचा लाभ घेतलेला आहे, अशा निवृत्तिवेतनधारकांना संदर्भ क्र.१ येथील दिनांक ०५.०२.२०२१ च्या शासन निर्णयान्वये सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित होणाऱ्या मूळ निवृत्तिवेतनावर सुधारित अंशराशीकरणाचा लाभ देय करण्यात आला आहे. तसेच संदर्भ क्र.४ येथील दिनांक ०७.११.२०२२ च्या शासन परिपत्रकान्वये सुधारित अंशराशीकरणाचे प्रस्ताव महालेखापाल कार्यालयास सादर करण्यास दिनांक ३१.१२.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

२. तथापि, अद्यापही दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित अंशराशीकरणाचे लाभ देण्याची कार्यवाही अनेक प्रकरणांमध्ये प्रलंबित असून त्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यास लागणारा कालावधी विचारात घेता सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित न झालेले अंशराशीकरणाचे प्रस्ताव सादर करण्यास दि. ३१.१२.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखांची राहील.

३. ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषित्तर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये आणि कृषि विद्यापीठे यामधील निवृत्तिवेतनधारक यांना वरील परिपत्रक योग्य त्या फेरफारांसह लागू राहील.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहील.

५. सदर परिपत्रकातील तरतुदी अखिल भारतीय सेवेतील निवृत्तिवेतनधारक / राजकीय निवृत्तिवेतनधारक / स्वातंत्र्य सैनिक निवृत्तिवेतनधारक / शौर्यपदकभत्ता निवृत्तिवेतनधारक / जखम अथवा इजा निवृत्तिवेतनधारक यांना लागू होणार नाहीत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२३०६१९१५२२१८४४०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DR RAJENDRA
UTTAMRAO GADEKAR

Digitally signed by DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=b8e8c3a034acb70f16af6f81c69ca038f6f25f78cfc9e6d815fd95b5367b07, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=37A42E1828ACE4C129A8BEB54E27836D32D401560638F644A54786720S474EE5, cn=DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
Date: 2023.06.19 15:23:08 +05'30'

( डॉ. राजेंद्र गाडेकर )
उप सचिव, वित्त विभाग

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य
८) मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
९) मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
१०) सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
११) मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
१३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

१४) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई- ४०० ०३२
१५) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१६) मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई
१७) राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई.
१८) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
१९) सचिव, राज्य निवडणूक आयोग
२०) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग
२१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
२३) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२४) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
२५) सर्व विभागीय आयुक्त
२६) सर्व जिल्हाधिकारी
२७) मंत्रालयातील सर्व विभाग
२८) मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख
२९) सचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
३०) सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
३१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३२) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई
३३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.
३४) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर
३५) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
३६) सर्व कोषागार अधिकारी.
३७) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.
३८) प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ न्याय शाखा) मुंबई,
३९) प्रबंधक, उच्च न्यायालय ( अपील शाखा) मुंबई.
४०) प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
४१) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद
४२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
४४) संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
४५) संचालक (तंत्र शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई
४६) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
४७) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई
४८) कुल सचिव, सर्व कृषि व कृषितर विद्यापीठे
४९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई - ४०० ०३२
५०) वित्त विभागातील सर्व कार्यासने
५१) निवड नस्ती (कार्यासन सेवा-४) वित्त विभाग.